आवक क्र. ३६५३/२४
जिल्हा न्यायालय, यवतमाळ
दिनांक १३.०८.२४

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, यवतमाळ हयांचे कार्यालय

## नोटीस

संदर्भ - मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे ईमेल पत्र क्रमांक बी. (जनरल)— ५६०१/५७/२०२४/७५४ दिनांक २५ एप्रील २०२४

...........

जिल्हा न्यायालय, यवतमाळ व अधिनस्त न्यायालयाचे आस्थापनेवरील सफाईगार संवर्गातील ०९ रिक्त पदाच्या भरतीबाबत स्वच्छता आणी चापल्यता चाचणीकरीता पात्र झालेल्या यासोबतच्या उमेदवारांच्या यादीनुसार सर्व उमेदवारांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, त्यांची स्वच्छता चाचणी आणि मौखिक चाचणी (Interview) खालीलप्रमाणे नियोजित भरती प्रक्रियेच्या दिनदर्शिकेनुसार (Recruitment Calendar) जिल्हा न्यायालय, यवतमाळ येथे भरती प्रक्रिया राबविण्याचे या कार्यालयाच्या भरती प्रक्रिया समितीने ठरविलेले आहे.

### सफाईगार भरती प्रक्रियेची दिनदर्शिका (Recuruitment Calendar)

| अ. क्रं. | स्वच्छता आणि चापल्यता चाचणीचा दिनांक व वेळ | उमेदवाराचे रोल नंबर | प्रक्रिया |
|---|---|---|---|
| १ | **२८/०८/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | ०१ ते २०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| २ | **२९/०८/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | २०१ ते ४०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| ३ | **३०/०८/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | ४०१ ते ६०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| ४ | **३१/०८/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | ६०१ ते ८०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| ५ | **०१/०९/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | ८०१ ते १००० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| | ०१/०९/२०२४ दु. १२.०० ते दु. ०१.०० | १००१ ते १२०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| | ०१/०९/२०२४ दु. ०३.०० ते दु. ०४.०० | १२०१ ते १४०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| ६ | **०२/०९/२०२४** सकाळी ९.०० ते १०.०० | १४०१ ते १६०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| | ०२/०९/२०२४ दु. १२.०० ते दु. ०१.०० | १६०१ ते १८०० | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| | ०२/०९/२०२४ दु. ०३.०० ते दु. ०४.०० | १८०१ ते १९९९ | पात्र उमेदवारांची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी |
| ७ | **०४/०९/२०२४** | ... | स्वच्छता आणि चापल्यता चाचणीचे निकाल आणि मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी व मुलाखतीचा दिनांक घोषीत करण्यात येईल. |

उमेदवारांकरिता महात्वाच्या सुचना पुढील पानावर

**<u>उमेदवारांकरिता महात्वाच्या सुचना -</u>**

१. सर्व उमेदवारांना पोष्टाद्वारे परिक्षापत्र/प्रवेशपत्र पाठविण्यात आले आहे.

२. ज्या उमेदवारांना पोष्टाद्वारे पाठविण्यात आलेले परिक्षापत्र/प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास त्यांना या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीनुसार चाचणी करीता दिलेल्या तारखेवर परिक्षापत्र/प्रवेशपत्र उपलबध्द करुन देण्यात येईल.

३. सर्व उमेदवारांनी दिलेल्या तारखेवर स्वच्छता आणी चापल्यता चाचणी करीता दिलेल्या वेळाच्या अर्धा तास आधी हजर राहुन अर्जा संबंधी पडताळणी करुन घ्यावी.

४. ज्या उमेदवाराच्या नावात काही त्रृटी असल्यास या कार्यालयाकडुन दस्तऐवज पडताळणी नंतर दुरुस्ती करुन देण्यात येईल.

५. सर्व पात्र उमेदवारांनी स्वच्छता व चापल्यता चाचणी करिता दिलेल्या तारखांना जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील प्रांगणात दिलेल्या तारखेवर वेळेच्या अर्धा तास आधी आपले प्रवेशपत्र, मुळ आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत घेवून हजर राहावे. तसेच कार्यालयाने दिलेल्या सुचनेचे पालन करावे. उमेदवारांनी त्यांच्या सोबत असलेल्या नातेवाईकांना जिल्हा न्यायालयाच्या प्रांगणात आणू नये.

६. स्वच्छता व चापल्यता चाचणीसंबंधी काही शंका किंवा चौकशी करावयाची असल्यास, संबंधीत उमेदवाराने या कार्यालयाचे हेल्पलाईन क्रंमाक ०७२३२-२४२३८० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेतच संपर्क करावा.

७. कोणत्याही उमेदवाराने भरती प्रक्रियेसंबंधी न्यायालयाच्या कोणत्याही कर्मचा-याशी संपर्क करु नये. तसेच कोणत्याही प्रकारचा वशिला/शिफारस लावण्याचा प्रयत्न करु नये, तसे आढळल्यास त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सदरहू नोटीस जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर आणि कार्यालयाच्या सुचना फलकावर आज दिनांक १३/०८/२०२४ रोजी भरती प्रक्रिया समितीच्या आदेशानुसार प्रबंधक यांचे स्वाक्षरी तथा जिल्हा न्यायालय, यवतमाळ या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात आले.

आदेशानुसार

13.8.24
प्रबंधक
जिल्हा न्यायालय, यवतमाळ

सोबत - पात्र उमेदवारांची यादी.
दिनांक १३/०८/२०२४